SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
E-mail address- affiliationt1@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
(संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६,२६०९१४६)
East:1962
NAAC 'A' Grade

जा.क्र. शिवाजी वि./संलग्नता टी.१/ - 0226 दिनांक : 5 JAN 2019

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक,
सर्व संलग्न शारीरिक शिक्षण पदवी व पदव्युत्तर शिक्षण संस्था

विषय- मा.उच्च न्यायालय मुबंई यांनी याचिका क्र ५८५/२०१७ मध्ये दि ०६.११.२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबत.

संदर्भ -१)महाराष्ट्र शासन क्रमांक न्यायप्र २०१७/प्र.क्र.२१८/१७/विशि-१उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे दिनांक १२ नोव्हेंबर २०१८ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, अधिकार मंडळाच्या ठरावानुसार व सोबत दिलेल्या पत्रानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू

डॉ.व्ही.डी नांदवडेकर
कुलसचिव

सोबत वरील प्रमाणे

# महाराष्ट्र शासन

SHIVAJI UNIVERSITY
Vice-Chancellor's Office
Date 14 NOV 2018
Inward No. 615
To Whom Registrar

क्रमांक:-न्यायप्र २०१७/प्र.क्र.२१८/१७/विशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ३२.
दिनांक:- १२ नोव्हेंबर, २०१८.

SHIVAJI UNIVERSITY
Registrar's Office
Date 14 NOV 2018
Inward No. 615
To Whom AR(DI)

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय:- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.५८५/२०१७ मध्ये दि.०६.११.२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबत.

संदर्भ:- १) शासन पत्र क्र.न्यायाप्र-२०१६ प्र.क्र.५७९/१६/विशि-१, दि.१४.१२.२०१६
२) मा. उच्च न्यायालयाचे याचिका क्र.५८५/२०१८ मधील दि.०६.११.२०१७ चे आदेश.
३) मा. सर्वोच्च न्यायालयाचे विशेष अनुमती याचिका क्र.१८५६२/२०१८ मधील दि.०९.१०.२०१८ चे आदेश.

डॉ. गोरक्ष पारगांवकर यांनी प्राचार्य, मुं. शा. शि. मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, मुंबई यांनी त्यांना शासन निर्णय दि.०५ मार्च, २०११ व दि.१२ जुलै, २०१६ मधील तरतुदी लागू व्हाव्यात यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.५८५/२०१७ दाखल केली होती. सदरहू याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.०६ नोव्हेंबर, २०१७ व दि.२८ नोव्हेंबर, २०१७ रोजी दिलेल्या आदेशान्वये याचिकाकर्ते यांची मागणी मान्य केली आहे. सदर आदेशातील कार्यत्मक भाग खालीलप्रमाणे आहे.

I) It is held and declared that the Government Resolution dated 5th March 2011 and Government Resolution 12 july, 2016 annexed at Exhibit-O are also applicable to the Physical Education Colleges receiving grant-in-aid from the State of Maharashtra and which are affiliated to Non-Agricultural Universities.

II) The Respondent-State is directed to refer the case of the petitioner for continuation till he attain the age of 65 to the Scrutiny Committee as appointed under the Government Resolution dated 5th March 2011 and 12 july, 2016 Annexed at Ehibit-O and if the Scrutiny Committee finds that the Petitioner is entitled to continue till the age of 65 years, he is directed to continues as Principal till he attains the age of 65 years

२. मा. न्यायालयाचे उक्त आदेश शासन धोरणाविरुध्द असल्याच्या कारणास्तव शासनाने त्याविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.१८५६२/२०१८ दाखल केली. सदरहू विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.१०.२०१८ रोजीच्या सुनावणीत फेटाळलेली आहे. त्यामुळे मा.

उच्च न्यायालयाने याचिका क्र.५८५/२०१७ मध्ये दि.०६.११.२०१७ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुपालन करणे अपरिहार्य झाले आहे. ही बाब विचारात घेता खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

१) मा. न्यायालयाने याचिका क्र.५८५/२०१७ मध्ये दि.०६ नोव्हेंबर, २०१७ व दि.२८ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या आदेशानुसार दि.०५ मार्च, २०११, दि.१२ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले धोरण राज्यातील अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालयांतील प्राचार्यांना लागू होत आहे.

२) उक्त याचिकेमधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित महाविद्यालयाने याचिकाकर्ते यांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमानात मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित विद्यापीठाच्या शैक्षणिक कामकाज आढावा समितीपुढे सादर करणे आवश्यक आहे.

३) विद्यापीठाच्या शैक्षणिक कामकाज आढावा समितीने प्राप्त मुदवाढीच्या प्रस्तावांची छाननी उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार करावी व स्पयंस्पष्ट अशा सकारात्मक/नकारात्मक शिफारशींसह सदरहू प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडे सादर करावा.

४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक कामकाज आढावा समितीकडून प्राप्त झालेले प्राचार्यांच्या मुदवाढीचे प्रस्ताव विनाविलंब शासनास सादर करावेत. शासनस्तरावर असे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रचलित धोरणानुसार त्यावर अंतिम निर्णय घेण्यात येईल

(विजय साबळे)
शासनाचे अवर सचिव

प्रत :- आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी,
मा. कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे,
कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
निवड नस्ती (विशि-१)